REGISTERED No. B. 3434




# अर्थ

वर्ष १४ | पुणें, बुधवार तारीख १७ नोव्हेंबर, १९४८ | अंक ४४


## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

फोन नं. ४८३ | तारेचा पत्ता " Cencobank " | पोस्टबॉक्स नं. ५११

मुख्य कचेरीः—लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

## बँक ऑफ पूना लि.

— शेड्यूल्ड बँक —

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | २५,००,००० |
| वसूल भांडवल | १२,५०,००० |

संचालक मंडळ

१ शेठ मुरलीधर चतुर्भुज लोया—चेअरमन, २ शेठ डी. आर. नाईक, जे. पी. ( व्हा. चेअरमन ), ३ डॉ. ना. भि. परुळेकर एम. ए., पीएच. डी., संचालक—सकाळ, ४ शेठ फ्रामजी पी. पोचा, ५ शेठ लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी ( सोलापूर ), ६ शेठ नारायणदास श्रीराम सोमाणी, ७ शेठ गणपतराव काळूराम नाईक, बी. एससी., बी.ई.,एलएल. बी.

मुख्य ऑफिस--४५५, रविवार, पुणें

शाखाः—( १ ) भवानी पेठ, ( २ ) सदाशिव पेठ, पुणें २, ( ३ ) सोलापूर, ( ४ ) सांगली.

हिंदुस्थानांतील प्रमुख शहरांवर ड्राफ्ट्स व हुंड्या दिल्या जातात.

आपल्याजवळच्या पैशाचा योग्य मोबदला या बँकेच्या निरनिराळ्या योजनेनें घ्या. सेफ डिपॉझिट लॉकरची सोय.

विशेष माहितीकरितां लिहा—

गो. ग. साठे, ए. बी. आय. (लंडन), मॅनेजर

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें







# आगाऊ तरतूद करा

आपल्या शेतीवरील पुढें होणारी पाणीपुरवठ्याची अडचण दूर करण्यासाठी आतांच पंप व एंजिन्सची ऑर्डर द्या.

— चौकशी करा —

केळकर बंधु, बुधवार चौक पुणें २.


## विविध माहिती

**हिंदुस्थानसाठी रशियाचा गहू**—ताग आणि चहा ह्यांच्या बदली १ लाख टन गहू हिंदुस्थानला पुरविण्याला रशिआ तयार आहे, असें समजतें. या देवाण-घेवाणीसंबंधीं हिंदुस्थान सरकारचें अनुकूल विचार करीत आहे. पूर्वीच्या एका करारा-प्रमाणें रशिआनें हिंदुस्थानला ५० हजार टन गहू पुरविला आहे.

**बटाट्याच्या पिकासाठी कर्ज**—पुणें, नाशिक, नगर, सातारा आणि बेळगांव ह्या पांच जिल्ह्यांतील गरीब शेतकऱ्यांना २० लाख रुपयांपर्यंत तगाई कर्जें देण्याचें मुंबई सरकारनें जाहीर केलें आहे. हें कर्ज १९४८-४९ सालासाठीं देण्यांत येणार असून त्याचा उपयोग बटाट्याचें बीं व खतें विकत घेण्यासाठी करण्यांत यावयाचा आहे. कर्जाची वाटणी पुढील प्रमाणें करण्यांत आली असून जिल्ह्यांच्या कलेक्टरांकडे रकमा सुपूर्त करण्यांत आल्या आहेत. पुणें जिल्हा: १५ लाख रु., नाशिक जिल्हा: ३ लाख २० हजार रु, नगर जिल्हा: १ लाख रु., सातारा जिल्हा: ५० हजार रु. आणि बेळगांव जिल्हा ५० हजार रु.

**प्रीमिअर ऑटोमोबाइल कंपनी**—३० जून, १९४८ रोजीं पुऱ्या झालेल्या वर्षी कंपनीला कराला पात्र असा १९ लाख, ६९ हजार, २१२ रुपये नफा झाला. गेल्या वर्षीचा नफ्याचा आंकडा ८ लाख, ५१ हजार, ९६५ रुपये होता. हा फायदा, विक्रींत बरीच वाढ झाल्यामुळें झाला असून त्यांतून शंभर रुपयांच्या 'ए' ऑर्डिनरी भागावर ३ टक्के करमाफ नफा प्रथमच जाहीर करण्यांत आला आहे.

**निर्वासितांच्या पुनर्वसाहतीसाठी लॉटरी**—निर्वासितांच्या पुनर्वसाहतीसाठी हिंदुस्थान सरकारनें स्वतः लॉटरी काढून पैसे गोळा करावे अशी सूचना पूर्व-पंजाब सरकारनें हिंदुस्थान सर-कारला केली असल्याचें समजतें. हिंदुस्थान सरकारला हें शक्य झालें नाहीं, तर पूर्व-पंजाबचें सरकार स्वतःच अशी सरकारी लॉटरी काढण्याची परवानगी मध्यवर्ती सरकारकडे मागणार आहे.

**पाकिस्तानच्या नव्या नोटा**—पाकिस्तान सरकार नव्यानें काढणार असणाऱ्या ५, १० व १०० रुपयांच्या नोटा नव्या तांत्रिक प्रक्रियेनें छापण्यांत येणार आहेत. त्यासाठी लागणारा नव्या प्रकारचा छापखाना सध्या उभारला जात आहे. ह्या नवीन प्रकारानें होणाऱ्या छपाईमुळें बनावट नोटा तयार करणें अशक्य-प्राय होणार आहे.

**सहकारी संस्थेला तोटा**—प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्ह असोसिएशन लि. या संस्थेच्या १९४७-४८ च्या वार्षिक अहवालांत १५,०१३ रुपये तोटा झाल्याचें दिसून येतें. संस्थेनें १९४८-४९ मधील कार्यक्रम म्हणून सरकारचे एजंट या नात्यानें सुताचें वांटप हातीं घेण्याचें ठरविलें आहे. ह्या व इतर कार्यक्रमासाठी २५ लाखांचें भांडवल उभारण्याचा संकल्प आहे.

**हिंदुस्थानांत पेट्रोल तयार होणार**—परदेशांतून आयात केलेल्या क्रूड ऑईलपासून शुद्ध पेट्रोल करण्याचे कारखाने काढण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. हे कारखाने बंदरांतून उभार-ण्यांत येणार आहेत. परकीय हुंडणावळ-विशेषतः डॉलर्स-कमी खावी लागावी असा हे कारखाने काढण्याचा उद्देश आहे. कार-खाने उभारण्याची तांत्रिक शक्यता अजमावण्यासाठी ६ परदेशीय तज्ज्ञ—ब्रिटिश आणि अमेरिकन—सरकारच्या विनंतीनुसार हिंदुस्थानांत आले आहेत.

**युरोपांतील ग्राहकांचे संघ**—गेल्या महिन्यांत प्राग येथें भरलेल्या आंतरराष्ट्रीय सहकारी कॉंग्रेसला श्री. व्ही. पी. वर्दे हे गेले होते. त्यांनीं एका मुलाखतींत असें सांगितलें कीं, युरोपमधील सहकारी चळवळ ही आपल्या पायावर स्वतंत्रपणें उभी आहे. हिंदुस्थानांत मात्र सरकारी मदतीवरच विशेष भर देण्यांत येतो. ग्लासगो येथील स्कॉटिश को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे तर स्वतःचे कारखाने व मालाच्या विक्रीचे स्टोअर्स आहेत. हॉलंडमध्यें फळें, फुलें आणि भाजीपाला यांच्या निर्मितीसाठी व विक्रीसाठी सहकारी संस्था आहेत. डेन्मार्कमध्यें व स्वीडनमध्यें दूधदुभतें, अंडीं आणि पाव-बिस्किटें यांच्या सहकारी संस्था आहेत.

**नफ्यावर मर्यादा घालणारा वटहुकूम**—चलनवृद्धीला आळा घालण्याचा एक उपाय म्हणून हिंदुस्थान सरकारनें नफ्याच्या वाटणीवर मर्यादा घालणारा एक वटहुकूम काढला आहे. हा वट-हुकूम फक्त पब्लिक कंपन्यांना लागू असून ३१ मार्च, १९४८ पूर्वीच्या दोन वर्षांत वाटल्या गेलेल्या रोख नफ्याच्या सरासरीपेक्षा अगर वसूल भांडवलाच्या ६ टक्क्यांपेक्षा, जी रक्कम अधिक असेल तेवढाच नफा वाटण्याची मर्यादा घालण्यांत आली आहे. ही मर्यादा दोन वर्षेंपर्यंत अंमलांत रहाणार आहे.

**चैनीच्या वस्तूंवर वाढता आयात कर**—हिंदुस्थान सरकारनें आयात होणाऱ्या चैनीच्या वस्तूंवरील करांत वाढ करण्याचें ठर-विलें आहे. कापसाच्या कापडाच्या निर्यातीवर, मालाच्या किंमतीवर २५ टक्के जकात होती ती १० टक्के करण्यांत आली आहे. या शिवाय एरंडीचें बीं व तेल या जिनसांवरील निर्यात जकात ताब-डतोब रद्द करण्यांत आली आहे. ही उपाययोजना चलनवृद्धीला आळा घालण्याच्या प्रयत्नांचाच एक भाग आहे. ज्या वस्तूंवरील आयात जकात वाढली आहे त्यांत निरनिराळ्या प्रकारची पिण्याची दारू, सिगार आणि सिगरेटस, सोन्याचा अगर चांदीचा मुलामा दिलेल्या जिनसा, खेळणीं इत्यादी वस्तू आहेत.

**बनारसची पुनर्घटना**—संयुक्त प्रांत सरकारनें बनारस शह-राची विमानानें पहाणी करून शहराची पुनर्घटना करण्याचें ठर-विलें आहे. नुकत्याच होऊन गेलेल्या पुरांत पडलेलीं ७,००० घरें पुनः बांधण्यांत येणार आहेत.


-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
-खादीचें माहेरघर-

# खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ
पुणें २

# अर्थ

बुधवार, ता. १७ नोव्हेंबर १९४८





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


## उत्पादनवाढीच्या मार्गांतील अडचणी

### "टाटा क्वार्टर्ली"चें पृथःकरण : कारखानदारांस सल्ला

औद्योगिक उत्पादन वाढलें पाहिजे, ह्या विषयीं सर्वांचें एकमत असलें तरी तें काय केलें असतां वाढेल, ह्याबद्दल मात्र वेगवेगळीं मतें ऐकूं येतात. तातडीनें उत्पादनवाढ होण्याची शक्यता कितपत आहे आणि ही वाढ घडवून आणताना चलनवृद्धीस आळा घालण्याचे कार्यक्रमांत येणारा व्यत्यय कसा टाळता येईल, हे प्रश्न ह्या संबंधांत महत्त्वाचे आहेत. नवे कारखाने उभारण्याचा विचार तूर्त बाजूस ठेवून, आहे त्या यंत्रसामुग्रीपासूनच युद्धकालाइतकें उत्पादन मिळविण्याचा प्रयत्न करणें हीच गोष्ट सध्या अगत्याची आहे. युद्धकालांतील उत्पादनाच्या मानानें गेल्या दोन वर्षांत उत्पादन किती घटलें आहे, हें खालील तक्ता दर्शवितोः —

| | पोलाद (००० टन) | सिमेंट (००० टन) | कापड (कोटी वार) | ताग (००० टन) | कागद (००० हं.) |
|---|---|---|---|---|---|
| युद्धकालांतील कमाल वार्षिक उत्पादन | १२०१ | २२०९ | ४८५ | १२३४ | १८२९ |
| १९४६ मधील उत्पादन | ८९२ | २०१९ | ४०२ | १०४९ | १५६४ |
| १९४७ मधील उत्पादन | ८८९ | १६३६ | ३७७ | १०४७ | १३२४ |

पोलाद, सिमेंट, कापड, ताग, कागद, ह्या सर्वांचेंच उत्पादन घटलेलें आढळतें. उत्पादनघटीचें सर्वांत महत्त्वाचें कारण यंत्रसामुग्रीची झालेली कमालीची झीज, हें होय. युद्धकाळांत तिचेवर मनस्वी ताण पडला, परंतु आवश्यक ती दुरुस्ती मात्र बंद ठेवली गेली. जुने भाग बदलून नवे टाकण्याचे कामीं इतका खंड पडला, कीं १९४४-४५ अखेर जुन्या किंमतीप्रमाणेंच २० कोटी रुपयांची दुरुस्ती मागे पडली होती. कारखान्यांतील यंत्रसामुग्री पुनः पूर्ववत् काम देण्यालायक करावयाची म्हटल्यास, येत्या एक-दीड वर्षांत हिंदुस्थानानें २०० कोटी रुपयांचा भांडवली माल आयात केला पाहिजे. एकट्या कापडाच्या गिरण्यांत ४०% यंत्रसामुग्री बदलण्याच्या लायकीची झाली आहे. पोलादाचा धंदा पूर्ववत चालू ठेवण्यास ३७ कोटींची यंत्रसामुग्री लागेल. "टाटा क्वार्टर्ली"च्या ताज्या अंकांत वरील माहिती दिली असून, उत्पादनाच्या घटीची कारणमीमांसा केली आहे आणि उपायांचेंहि दिग्दर्शन केलें आहे.

कोळसा, कच्चा माल, इत्यादींचा तुटवडाहि कारखान्यांना भासत आहे. सध्या ३ कोटी टन कोळशाची गरज असतांना, उत्पादनाचा आकडा २३ कोटी टनांवर जात नाहीं आणि २ कोटी टनांपेक्षा जास्त कोळशाची वहातुक होऊं शकत नाहीं. इंजिनिअरिंगच्या धंद्याची कुचंबणा होण्याचें एक महत्त्वाचें कारण म्हणजे पोलादाचा तुटवडा हें होय. सिमेंटहि भरपूर मिळत नसल्यामुळें कारखान्यांच्या इमारतींच्या बांधकामाची कुचंबणा होत आहे आणि कामगारांना रहातीं घरें बांधून देण्याच्या कार्यक्रमांत व्यत्यय येत आहे. वहातुकीच्या गैरशिस्तीमुळें कारखाने वरचेवर बंद ठेवावे लागून त्यांच्या उत्पादन-क्षमतेपेक्षा त्यांचें उत्पादन कमी होऊं लागतें. रेल्वेजना उद्योगधंद्यांची नड पुरी भागविता येण्यास तीन ते पांच वर्षे लागतील असा अंदाज आहे.

### कामगारांचे संप व इतर कारणें

कामगारांच्या संपामुळेंच मुख्यतः उत्पादनवाढीस व्यत्यय येत आहे असें नाहीं, हें "टाटा क्वार्टर्ली"नें नमूद केलें आहे. १९४५ सालीं संपामुळें मुंबईच्या गिरण्यांचे कामाचे ३ लक्ष दिवस बुडाले तर १९४७ सालीं २३ लक्ष दिवस बुडाले. म्हणजे, ह्या नुकसानींत दोन वर्षांत ६६६% वाढ झाली. कामाचे इतके दिवस बुडाले, तरी कामाचे भरलेले दिवस पाहिले तर त्यांची संख्या अनुक्रमें ५ कोटी, ७० लक्ष व ५ कोटी, ३४ लक्ष भरते. म्हणजे, एकूण कामाचे दिवस ८%च कमी भरले. असें असूनहि उत्पादन २५% कमी झालें ह्यावरून उत्पादनास व्यत्यय आणण्याचे कामीं इतर कारणें अधिक प्रभावी आहेत, असा अर्थ होतो.

संपामुळें उत्पादनाचा दर नगी खर्च वाढला असला, तरी उत्पादनाच्या गतीवर झालेला परिणाम तेवढासा गंभीर म्हणता येणार नाहीं. विशेषतः कच्चा माल, स्टोर्स, कोळसा, इत्यादींच्या तुटवड्यामुळें सर्वच उद्योगधंदे त्यांच्या कमाल मर्यादेपर्यंत एकदमच चालू रहाणें अशक्य असल्या कारणानें, कामाचे दिवस बुडाले, त्यामुळें त्या त्या धंद्याला हा तुटीचा माल पुरवून वापरता आला असें म्हटलें, तर तें चुकीचें होणार नाहीं. संपापेक्षां कामाचे तास ९ चे ८ केल्यानेंच ज्यास्त अपाय झाला आहे. कपास कापडाच्या धंद्यापुरतें पाहिलें, तर उत्पादन कमी होण्याची कारणवारी खालील प्रमाणें आहेः—

| | |
|---|---|
| संप, गैरहजेरी, मंद काम, जातीय दंगे | ६% |
| वरच्या नंबराच्या कापडाच्या उत्पादनाची प्रवृत्ति | ४% |
| ९ चे ८ तास काम | १०% |

कामगारांनीं आपली जबाबदारी ओळखून कसून काम केलें, तर उत्पादनवाढीस मदत होईल हें खरें असलें तरी कामगारांचा प्रश्न हा उत्पादन वाढीच्या मार्गांतील सर्वांत बिकट प्रश्न नव्हे, असें "टाटा क्वार्टर्ली"चें मत आहे. मग उत्पादन वाढीचा मार्ग कोणता ?

### कारखानदारांनीं आपली तळमळ स्पष्ट दाखवावी

हिंदी कारखान्यांस सहाय्यकारक होईल अशा मालाची आयात वाढवून त्यासाठी बाकीची आयात मर्यादित केली पाहिजे. आहे त्याच पैशाचा व इतर सामुग्रीचा अधिकांत अधिक उपयोग केला पाहिजे. हें सर्व करण्यासाठी योजना केली पाहिजे. उत्पादनवाढीस जास्त नफ्याच्या आकर्षणाचा येथें प्रश्नच उपस्थित होत नाहीं. यंत्रसामुग्रीचें पुनरुज्जीवन करून तुटीच्या मालाचा अधिकाधिक चांगला उपयोग करणें हेंच आज महत्त्वाचें आहे. उत्पादनवाढीमुळें समाजाच्या विशिष्ट वर्गाचीच चलती न होता सबंध समाजास त्याचा फायदा मिळत आहे हें स्पष्ट दिसूं लागलें, सर्व

प्रकारचा काळाबाजार बंद झाला, भरमसाट नफे बंद पडले म्हणजे कामगारांच्या दृष्टीनें अनुकूल वातावरण निर्माण होईल. किंमती रोखून, कामगारांच्या वेतनाची क्रयशक्ती कायम ठेवली तरच जादा वेतनाचें आकर्षण प्रभावी होईल. कामगारांना एकूण यावयाच्या नफ्याची रक्कम कमी न करतां, वैयक्तिक कामगाराचें काम आणि त्यास मिळावयाची मजुरी ह्यांत सुसंगतपणा राखण्यास पोषक असें धोरण आखण्यास कारखान्यांना प्रोत्साहन दिलें पाहिजे. कामगारांना आदेश न देता, त्यांना आर्थिक संकट समजाऊन सांगून तें सोडविण्यासाठी प्रत्येक जण ( सरकार व कारखानदार-सुद्धा ) काय करीत आहे हें पटवून दिलें पाहिजे. इकडे कामगारांत असंतोष वाढत आहे, त्याबरोबरच कारखान्यांच्या चालकांची व्यवस्थेची पात्रता कमी होऊं लागलेली दिसते. उत्पादन वाढीकडे दुर्लक्ष्य होत आहे. वाटून मिळालेल्या मालाचा दुरुपयोग आणि उत्पादित मालापैकीं कांहीं मालाचा पद्धतशीरपणें काळा बाजार हे गुन्हे कांहीं असामान्य कोटींतले नाहींत. त्यावर सरकारी देखरेख अधिक कडक आणि मनापासून झाली पाहिजे. डिव्हिडंडवर आपण होऊन नियंत्रण घालून, सरकारी निर्बंध काटेकोरपणानें पाळून, औद्योगिक योजना आखण्यांत सरकारशी व रेल्वेजशी सहकार्य करून, कारखानदार आपली बाजू तरी बळकट असल्याचें दाखवूं शकतील. त्याखेरीज कारखानदार-कामगार सहकार्य मनापासून घडून येणार नाहीं.

---

### रिझर्व्ह बँकेसाठी बँकर्सचें सल्लागार मंडळ

हिंदी बँकिंग बिलाच्या सिलेक्ट कमिटीच्या सभा सध्या दिल्ली येथें भरत आहेत. हें बिल मध्यवर्ती विधिमंडळाच्या येत्या बैठकींत मंजूर करून घेण्याचा सरकारचा विचार आहे. बिलानें रिझर्व्ह बँकेस नियंत्रणाचे व देखरेखीचे व्यापक अधिकार देऊं केले आहेत. परंतु त्या अधिकारांचा उपयोग करतेवेळीं तिला बँकर्सचा तज्ज्ञ सल्ला उपलब्ध असावा, असें इंडियन बँकिंग असोसिएशननें आपलें मत एका शिष्टमंडळाकरवीं सिलेक्ट कमिटीस नुकतेंच सादर केलें आहे. रिझर्व्ह बँकेस सल्ला देण्यासाठी एका सल्लागार मंडळाची कायदेशीर योजनाच करण्यांत यावी, असें शिष्टमंडळानें सांगितलें. ह्या संबंधींतील आपलें म्हणणें तपशीलवार शिष्टमंडळ सिलेक्ट कमिटीस सादर करणार आहे. सल्लागार मंडळ नेमलें जाण्याचा बराच संभव दिसतो. अशा मंडळावर प्रतिनिधित्व मिळणें लहानमोठ्या सर्व बँकांस शक्य व्हावें हें योग्य आहे. अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्ह बँक पद्धतींत सल्लागार कौन्सिलची कायदेशीर योजना आहे आणि तेथील फेडरल डिस्ट्रिक्टसच्या प्रतिनिधींची वर्षांतून चारदा तरी सभा घ्यावी लागते. ह्याच प्रकारचें प्रातिनिधिक सल्लागार मंडळ नेमलें जावें आणि त्यांत निवडून येण्यास मार्ग मोकळा असावा, हें योग्यच होईल. बड्या बँकांप्रमाणें लहान बँकांच्या प्रतिनिधींचाहि तज्ज्ञ सल्ला रिझर्व्ह बँकेस उपयुक्त वाटावा, हें उघड आहे; परंतु त्यांचा आवाज रिझर्व्ह बँकेच्या कानांवर जाण्याची निश्चित व्यवस्था झाली पाहिजे.

---

### अमेरिकेंतील परदेशीय विद्यार्थी

अमेरिकेंतील कॉलेजांत व विश्वविद्यालयांत एकूण २१,००० परदेशीय विद्यार्थ्यांना गेल्या वर्षी प्रवेश मिळाला. त्यापैकीं ७,४६९ युरोपांतील व ब्रिटिश साम्राज्यांतील होते. ५,५४६ चीन मधून व अतिपूर्वेकडून गेले; ४,७६६ द. अमेरिका खंडांतील होते आणि ३,१४२ मध्यपूर्व व आफ्रिका येथील होते. ह्याच वर्षी ११,००० अमेरिकन विद्यार्थी परदेशांत शिकत होते.

### पनवेल येथील सहकारी दिन

शनिवार ता. ६-११-४८ रोजीं सायंकाळीं पनवेल येथें सहकारी खरेदी-विक्री संघाच्या कचेरींत " सहकारी दिन " साजरा करण्यांत आला. स्थानिक सहकारी संस्थांचे मुख्य व नोकर आणि इतर नागरिक उपस्थित होते.

### स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लि., पुणें.

वरील खासगी कंपनीचें आतां २५ लक्ष रुपयांच्या पब्लिक कंपनींत रूपांतर झालें असून तिचे ४½ लक्ष रुपयांचे भाग खपले आहेत. १० लाखांचे भाग विक्रीस काढण्यांत येत आहेत. कंपनीच्या कारखान्याच्या विस्तारासाठी मुंबई सरकारनें तिला ६,००,००० रुपये कर्ज दिलें आहे.

### निर्वासितांची सहकारी शेती

२५ निर्वासित एकत्र येऊन, छत्रपूर ह्या दिल्ली पासूनच्या १२ मैलांवरील खेड्यांत त्यांनीं सहकारी शेतीस प्रारंभ केला आहे. त्यासाठी एक मल्टिपर्पज सोसायटी स्थापन करण्यांत आली आहे. सोसायटीचे सभासद ४०० एकर जमिनींत लागवड करणार आहेत. ट्रॅक्टर, बी, शेतीचीं अवजारें, इत्यादींचे बाबतींत मध्यवर्ती शेतकी खातें त्यांना मदत करीत आहे.

### फलटण टेक्स्टाइल मिल्स लि.

२७ सप्टेंबर ते १८ ऑक्टोबर, १९४८ ह्या मुदतींत १५ कंपन्यांना ३ कोटी, ४७ लक्ष रुपयांचें भांडवल उभारण्यास परवानगी मिळाली. त्यांत फलटण टेक्स्टाइल मिल्स लि., कापड बाजार, फलटण, हें नांव आढळतें. ही नवी कंपनी स्पिनिंग सुरू करणार आहे आणि तिला २० लक्ष रुपयांचें भांडवल उभारण्यास परवानगी मिळाली आहे.

### नॅशनल एअर इंडस्ट्रीज लि., दिल्ली.

एअर ॲकेडेमी स्थापन करणें, विमानांच्या दुरुस्तीसाठी वर्कशॉप चालविणें, विमानांची खरेदी-विक्री करणें, इत्यादींसाठी वरील २५ लक्ष रुपये भांडवलाची कंपनी निघाली आहे.

### भोर स्टेट बँक लि., पुणें शाखा

भोर स्टेट बँकेच्या पुणें शाखेंत ( ५१५, बुधवार पेठ श्री. मोटे ह्यांचा वाडा ) मंगळवार, ता. २ रोजीं लक्ष्मीपूजनानिमित्त पानसुपारीचा समारंभ घडवून आणण्यांत आला.

---

No. 30

# NOTIFICATION

In terms of the Reserve Bank (Transfer to Public Ownership) Act, 1948 all shares in the capital of the Reserve Bank of India shall be deemed to have been transferred on the 1st January 1949 to the Central Government and the shareholders of the Bank shall be entitled only to the compensation provided in the Act. In order to facilitate the preparation of the securities and cheques to be exchanged for the share certificates, as compensation, it is hereby notified that the Share Registers of the Bank will be closed and registration of transfers discontinued from the 1st Decemder 1948.

Reserve Bank of India,
Central Office,
Bombay. 6th November 1948.

C. D. DESHMUKH,
GOVERNOR.

पुणें सें. को. बँकेचा सहकारी सप्ताह

सहकारी दिनः ६–११–४८

# सहकारी प्रगतीची दिशा

( श्री. बी. पी. पटेल, रजिस्ट्रार, को. सो. )

पुणें सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँकेतर्फे पुण्यांतील सहकारी कार्यकर्त्यांनीं अखिल भारतीय सहकार दिन शनिवार दिनांक ६-११-१९४८ रोजीं सायंकाळीं बँकेचे दिवाणखान्यांत श्री. बी. पी. पटेल, रजिस्ट्रार कोऑपरेटिव्ह सोसायटीज, यांचे अध्यक्षतेखालीं साजरा केला. सुमारें १०० कार्यकर्ते समारंभास उपस्थित होते. बँकेचे चेअरमन श्री. ओगले ह्यांच्या प्रास्ताविक भाषणानंतर श्री. शेट्ये, श्री. दात्ये व श्री. पाटसकर ह्यांचीं समयोचित भाषणें झालीं. त्यानंतर श्री. पटेल ह्यांनीं खालीलप्रमाणें विस्तृत भाषण केलें:—

"स्वावलंबन, एकजूट व काटकसर हीं तीन सहकारी चळवळीचीं तत्त्वें आहेत. आपणाला जर न्यायाची समाज रचना करावयाची असेल तर आपण एकजूट करून कार्यास लागलें पाहिजे.

" देशाचें राज्ययंत्र सुरळीत चालणें हें बऱ्याच अंशीं त्याच्या आर्थिक व्यवस्थेवर अवलंबून असतें. आज तिची विषम वाटणी झालेली आहे ती सम प्रमाणांत करून सुख व शांती निर्माण करण्यासाठीच सहकारी चळवळीचा प्रारंभ झाला.

' गेल्या युद्धामुळें निर्माण झालेली परिस्थिति सुधारण्यासाठी अन्नधान्य व कापड या जीवनोपयोगी वस्तूंचें उत्पादन फार मोठ्या प्रमाणांत आपल्या राष्ट्रास करणें क्रमप्राप्त आहे; व तसें तें झाल्याशिवाय हल्लींच्या वाढलेल्या किंमती उतरणार नाहींत. तसेंच, आपल्या देशांत निर्माण झालेला नाण्याचा फुगवटा कमी झाल्याशिवाय राष्ट्राची आर्थिक घडी नीट बसणार नाहीं. हें साध्य गाठावयाचें असल्यास आपणास स्वावलंबन व परस्पर सहाय्य यांची जोड घेणें जरूर आहे. तसेंच, प्रत्येकानें काटकसर करून जी बचत राहील ती सहकारी संस्था अगर सरकार यांचेकडे गुंतविली पाहिजे. नाण्याच्या फुगवट्यामुळें त्याची खरी किंमत राहिलेली नाहीं. आजचे तीन रुपये हे युद्धापूर्वीच्या फक्त एक रुपयाइतकेच आहेत. ही परिस्थिती राष्ट्राच्या उत्कर्षाच्या दृष्टीनें ठीक नाहीं. हल्लीं पैसेवाल्यांचें राज्य आहे, असें दिसतें, तें आपणास लोकांचें राज्य करावयाचें आहे. आपणास कॉऑपरेटिव्ह कॉमनवेल्थ ( सहकारी राज-सत्ता) निर्माण करावयाची आहे, असें आपले पुढारी आपणास सांगत आहेत. भांडवलशाही व झोटिंगशाही यांतील सुवर्णमध्य सहकारी राज्यकारभार हा आहे, हें आपणा सर्वांस मान्यच आहे. सबब तें ध्येय गाठण्यास आपण सर्वांनीं प्रयत्न करावयास पाहिजे. जनता व सरकारी नोकर यांच्यामध्यें पूर्वीप्रमाणें फरक राहिला नसून ते सर्व आतां एकजीव झालेले आहेत.

"आपल्या प्रांतांत सहकारी चळवळीचे दृष्टीनें गेल्या दोन वर्षांत पुष्कळच प्रगति झाली असून या कालावधींत सुमारे १,७०० नवीन संस्था निर्माण झाल्या. विशेषतः आदिवासी लोकांमध्यें या चळवळीचा फार मोठ्या प्रमाणांत प्रसार झाला असून त्यामुळें त्यांच्या सांपत्तिक व सामाजिक परिस्थितींत पुष्कळच फरक घडून आला आहे. दोहद भागांतील भिल्ल लोकांना शेतीसाठी दरसाल १२ लक्ष रु. भांडवल लागतें, त्यापैकी हल्लीं सुमारे ८ लक्ष एवढें मोठें भांडवल त्यांनीं स्वतः बचत करून उभारलें आहे हें लक्षांत घेण्यासारखें आहे. रिझर्व बँकेनें, अखिल भारतांतील सहकारी संस्थांनीं गेल्या सात वर्षांत जी कामगिरी केलेली आहे तिचें समालोचन करून एक पुस्तक केलेलें आहे. त्यांतील आकडेवार व इतर माहितीवरून पहाता, सर्व दृष्टीनें आपल्या प्रांताचा क्रम पहिला लागला आहे. हें लक्षांत घेतां, खात्याचा प्रमुख म्हणून मला व प्रत्यक्ष कार्यकर्ते म्हणून आपणांस त्याबद्दल अभिमान वाटला तर त्यांत गैर काय आहे ? एकहजार लोकसंख्येंत आपल्या प्रांतांत ५९ सहकारी चळवळींत सभासद असतात, तर संयुक्त प्रांतांत १५ च असतात. यावरून आपल्या प्रांतांतील प्रगति दिसून येते. अशाच तऱ्हेनें व उत्साहानें आपण प्रयत्न करीत राहिलों तर हिंदुस्थान सरकारनें येत्या दहा वर्षांत जी प्रगति करण्याचा आपला संकल्प जाहीर केला आहे तेवढी प्रगति आपण पुढील पांच वर्षांतच करूं शकूं असा मला दृढ विश्वास वाटूं लागला आहे.

"अन्नधान्य व कापड या वस्तूंचें वाटप शक्य तितकें सहकारी संस्थांमार्फतच करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. त्यासाठी आपल्या संस्थांना सुमारे १२ कोटी रुपये भांडवल उभारावें लागेल व तेवढें आपण सहज जमवूं शकूं असा माझा भरवसा आहे.

"या प्रांतांत कांहीं विशिष्ट भागांत "सर्वोदय" योजना पुढील वर्षी अंमलांत आणण्याचें सरकारनें ठरविलें असून हें काम सहकारी संस्थांमार्फतच होणार आहे हें विशेष आहे.

"येत्या वर्षी सहकारी खात्यानें पुढील कार्यें करावयाचीं असा संकल्प केला आहे. ( १ ) गाडगीळ कमिटी व नानावटी कमिटी यांनीं केलेल्या शिफारशी प्रत्यक्ष अमलांत आणणें, ( २ ) प्रत्येक जिल्ह्यांतील कांहीं विशिष्ट क्षेत्रांत " सर्वोदय " योजना सुरूं करणें व ( ३ ) अन्नधान्य, कापडचोपड, सूत, वगैरे जीवनांस अत्यावश्यक वस्तूंचें वाटप सहकारी संस्थांमार्फत करून त्याबाबत जनतेची अधिक–अधिक सेवा करणें

"आपला भविष्य काळ उज्वल आहे अशी खात्री मनाशी बाळगून व सहकारी तत्त्वाचा अधिक अधिक प्रसार करून राष्ट्राची आर्थिक घडी खंबीर पायावर उभारण्याची आपण आज प्रतिज्ञा करूं या."

## पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ, लि.

वृत्तांताचे वर्षी संघानें अनेक प्रकारच्या मालाची मोठ्या प्रमाणांत खरेदी-विक्री केली. पुणें रेशनिंग विभागांत रीटेल रेशन दुकानदारांना उत्पादन केंद्रांतून गूळ खरेदी करून तो पुरविण्याचें काम घाऊक विक्रेते ह्या नात्यानें संघाकडे होतें. त्याप्रमाणें संघानें ८ लक्ष रुपयांचा गूळ पुरविला. खोबरेल तेलाचें इंपोर्टिंग एजंटचे व घाऊक विक्रेत्याचें कामहि संघानें केलें. संघानें २३ लक्ष रुपयांची सरकीहि इंपोर्टिंग एजंट ह्या नात्यानें कलेक्टर साहेबांस पुरविली. भिमथडी तालुक्याखेरीज बाकीच्या तालुक्यांसाठी सिमेंटच्या घाऊक विक्रेत्याचें काम संघानें केलें. लोखंड वाटपाचेंहि काम केलें. वरील मालाखेरीज पेंड, सल्फेट, चरक, नांगर इत्यादि मालाचाहि पुरवठा संघानें केला. संघानें एकूण २५ लक्ष, ७१ हजार रुपये किंमतीचा माल विक्री करून ४५,६१८ रु. निव्वळ नफा मिळविला. त्यापैकीं ६¼% डिव्हिडंडला फक्त २,१८२ रु. लागले. इमारत फंडाकडे २७ हजार रु. वर्ग करण्यांत आले.

( चेअरमनः श्री. ग. रा. गाडगीळ; मॅनेजर श्री. ना. द. कुलकर्णी)

## बॉंबे को-ऑपरेटिव्ह ट्रायब्यूनल

मुंबई सरकारनें वरील ट्रायब्यूनलची नेमणूक जाहीर केली आहे. सेवानिवृत्त डिस्ट्रिक्ट जज्ज श्री. आर. एम्. भिसे, श्री. जी. पी. मुर्डेश्वर व श्री. डाह्याभाई ए. पटेल हे ट्रायब्यूनलचे सभासद रहाणार असून त्यापैकीं श्री. भिसे हे त्याचे अध्यक्ष आहेत. मुंबई प्रांतांतील सहकारी रजिस्ट्रारचे अपेलेट व रिव्हिजनचे अधिकार ट्रायब्यूनलकडे सोपविलेले आहेत, हें वाचकांस माहीत आहेच.

## पुणें पोस्टल को. बँकेंत सहकारी दिन

सोमवार ता. ८ माहे नोव्हेंबर १९४८ रोजीं सायंकाळीं ६-३० वाजतां पुणें पोस्टल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या सभागृहांत सहकारी दिनानिमित डॉ. वा. रा. ढमढेरे यांचे अध्यक्षतेखाली सभा भरली होती. सभेंत श्रोतृवर्ग बराच होता. प्रथमारंभीं बँकेचे कार्याध्यक्ष श्री. एम्. एच्. शिंदे यांनीं उपस्थितांचें स्वागत करून डॉ. ढमढेरे यांना अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंती केली. अध्यक्ष स्थानापन्न झाल्यावर श्री. प्रधान यांनी बँकेची माहिती सांगितली. त्यानंतर श्री. दत्तात्रेय दिवाकर चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर, पुणें सें. को. बँक लि. यांनीं सुमारें अर्धातास भाषण करून सहकारी संस्थांची पाश्चात्य देशांत उत्पत्ति कशी झाली व त्यांची वाढ होऊन आपल्या देशांत त्यांचें बीज कसें पेरलें गेलें व सध्यां अशा संस्थांची वाढ आपल्या देशांत कशी झाली आहे याचें निवेदन केलें. सहकारी संस्थांमार्फत सभासदांच्या सर्व गरजा भागविण्याच्या नव्यानव्या योजना आतां हातीं घेतल्या पाहिजेत. नियंत्रित अन्न धान्य वाटप करणेचें काम कांहीं सहकारी संस्थांनीं हातीं घेऊन तें चांगल्या तऱ्हेनें त्या संस्था करीत आहेत. आतां कापड वाटपाचें कामही सहकारी संस्थांकडे सुपूर्त करण्याचें सहकारी धोरण आहे व तेंही काम आपण चांगल्या तऱ्हेनें करूं. अशा तऱ्हेची माहिती सांगून त्यांनीं आपलें भाषण संपविलें. त्यानंतर श्री. दादासाहेब करंदीकर व श्री. तुळशीबागवाले वकील यांचीं भाषणें झालीं. अध्यक्षांनीं स्वावलंबन, काटकसर, एकमेकांस मदत करण्याची भावना, हाच सहकारी संस्थांचा पाया आहे, असें सांगून आपणांस अध्यक्ष होण्याची संधि दिली याबद्दल चालकांचे आभार मानले. बँकेचे सन्मान्य चिटणीस श्री. कुळकर्णी यांनीं सर्व पाहुणे मंडळी व उपस्थितांचे आभार मानले व चहा, पानसुपारी होऊन हा समारंभ साजरा झाला.

## नगर सहकारी दिनोत्सवांत प्रि. कर्वे ह्यांचें भाषण

अहमदनगर येथें शनिवार ता. ६-११-४८ राजीं सायंकाळीं ६ वाजतां नगर सेंट्रल बँकेचे दिवाणखान्यांत पुण्याचे अर्थशास्त्रज्ञ व बृहन्महाराष्ट्र कॉमर्स कॉलेजचे प्रिन्सिपॉल श्री. डी. जी. कर्वे यांचे अध्यक्षतेखालीं सहकारी दिनोत्सव साजरा झाला. श्री. मो. कुं. फिरोदिया यांनीं अध्यक्षांचें स्वागत केल्यावर अध्यक्षांनीं आपले भाषणांत सहकारी चळवळ ही सर्व प्रकारच्या सरकारांनीं वेगवेगळया देशांत कशी पुरस्कृत केली, हें रशिया, इंग्लंड, जर्मनी, अमेरिका यांचीं उदाहरणें देऊन पटविलें. ते म्हणाले:—

"हिंदुस्थानांत ही चळवळ प्रथम परकीय सरकारचें धोरण म्हणून जरी सुरू झाली तरी तिचा पुरस्कार सर्वांनीं केला. आतां स्वातंत्र्य मिळाल्यामुळें तिला चांगली वाढ लागेल व युद्धोत्तर संक्रमण-काळींही चलनवाढ, भाव चढउतार इत्यादि कारणानेंही ती खची होऊं नये म्हणून सरकार जागरूक राहील. ती फोफावण्यासाठी कार्यकर्त्यांत व जनतेंत तिजबद्दल निष्ठा, कार्यांत सचोटी व कार्य-क्षमता आली पाहिजे. म्हणजे मग हल्लीं जो तिचा प्रचार फक्त पै जनतेंत आहे तो राहिलेल्या पै जनतेंतही होईल."

**गांधी-स्मारक फंड**—काँग्रेसचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद ह्यांनीं नागपूर येथें बोलतांना असें सूचित केलें कीं, गांधी राष्ट्रीय स्मारक निधीला पैसे देण्याची शेवटची तारीख ३० जानेवारी, १९४९ ही ठरविण्यांत येईल.


# विजय टेक्स्टाइल्स लि.

—येरंडवणा, पुणें ४—

आमची गेल्या वर्षांतील सर्वांगीण प्रगति आमच्या भागीदारांस व हितचिंतकांस निश्चित समाधानकारक वाटेल.

शेअर्स व ठेवी ह्याबद्दल पत्रव्यवहार करावा.

मॅनेजिंग एजंटस्.



# दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी:— ९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई
(मुंबई इलाख्याच्या १९२५ च्या ७ व्या कायद्यान्वये नोंदलेली)

स्थापन साल १९११

चेअरमनः-श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | | |
|---|---|---|
| भागांचें भांडवल | रु. | २०,२९,२०० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. | २७,२१,००० |
| ठेवी | रु. | ७,८९,७४,००० |
| खेळतें भांडवल | रु. | ८,९७,३७,००० |

प्रांतांतील दहा जिल्ह्यांमध्यें ५२ शाखा आहेत. हिंदी संघामधील महत्त्वाच्या शहरांमधून हुंड्या, बिलें वगैरे वसूल केलीं जातात. त्यांच्या शर्तींबद्दल मुख्य कचेरी-कडे चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

## वापरण्यास आवश्यक असणाऱ्या कापडाची तूट न पडूं देण्याचा प्रयत्न

| हिंदी गिरण्यांचें वार्षिक उत्पादन | वार्षिक उत्पादनाची वांटणी |
|---|---|
| ४५० कोटी वार | १३¾ कोटी वार वापरास अयोग्य.<br>४५ कोटी वार पाकिस्तानकडे कपाशीच्या मोबदल्यांत निर्गत.<br>३० कोटी वार इतर देशांकडे निर्गत.<br>१० कोटी वार लष्करी खातें. |
| | ९८¾ कोटी वार<br>३५१¼ कोटी वार नागरी पुरवठ्यास उपलब्ध |
| एकूण ४५० कोटी वार | ४५० कोटी वार |

वार्षिक ३५१¼ कोटी वार म्हणजे दरमहा १,९५,००० गांठी कापड होतें व तें हिंदी प्रांत व संस्थानें ह्यांस दरमहा उपलब्ध आहे. ८,३३३ गांठी सूत पाकिस्तानकडे पाठविण्यासाठी बाजूस काढलें आणि १,३०० गांठी सूत गिरण्यांना दिलें, म्हणजे दरमहा ८०,००० गांठी सूत उरतें. त्यापैकी, होजियरी, बेल्टिंग, टेप, कोळ्यांचीं जाळीं, इत्यादींसाठी ११,००० गांठी सूत लागतें. म्हणजे, हातमाग व पॉवरलूम ह्यांस दरमहा ६९,००० गांठी सूत मिळूं शकतें व त्यापासून दरसाल १४७¼ कोटी वार कापड निर्माण होतें.

हिंदुस्थानांत सध्या दरसाल दर माणशीं मिलचें १० वार व हातमागाचें ४ वार कापड तयार होतें. युद्धापूर्वीच्या उत्पादनापेक्षां हें उत्पादन कमी नाहीं; परंतु कापडाची आयात मात्र उतरली आहे. पूर्वीं दरमाणशीं १½ वार इतकें कापड बाहेरून येई. आतां तें दरमाणशीं ⅛ वार इतकेंहि येत नाहीं. तथापि, हिंदी उत्पादनहीं, त्याची नीट वाटणी झाल्यास, जनतेची किमान गरज भागवूं शकेल, अशी परिस्थिति आहे. कापड वाटपाची व्यवस्था करण्याचें काम प्रांतिक व संस्थानी सरकारांचें आहे. त्यांपैकीं मुंबई व पश्चिम बंगाल ह्यांनीं कापडाचें रॅशनिंगच करण्याचें ठरविलें आहे आणि दिल्लीमध्येंहि रॅशनिंग सुरू होणार आहे. टिकाऊ कापडाचें उत्पादन वाढावें, वापरण्यास जें कापड लागत नाहीं त्याचें उत्पादन कमी व्हावें आणि धोतरें व साड्या ह्यांचे प्रकार वाढावे, ह्या दृष्टीनें सरकार गिरण्यांवर कांहीं बंधनें घालणार आहे. हीं बंधनें १ डिसेंबरपासून अंमलांत येतील.

---

### दि बेलापूर कं. लि.

**( ३० सप्टेंबर, १९४८ अखेरचा अहवाल )**

वरील कंपनीस ५ लक्ष, ७९ हजार रुपये घसारा काढून व २२ लक्ष, २५ हजार रुपये करासाठी बाजूस ठेवून ३१ लक्ष, ६४ हजार रुपये निवळ नफा झाला. मजुरांच्या घरांचे योजनेसाठी ६ लक्ष रु. बाजूस काढावे, २½ लक्ष रुपये पिकांच्या विमाफंडांत टाकावे, ३½ लक्ष रुपये कॉन्टिन्जन्सी फंडांत घालावे, ११ लक्ष रुपये रिझर्व्ह फंडाकडे वर्ग करावे व ७,८९,५५८ रुपयांचा डिव्हिडंड देण्याकडे विनियोग करावा, अशी बोर्डाची शिफारस आहे. महात्मा गांधी स्मारक फंडास १,२७,७७२ रुपये मंजूर करण्यासाठी डायरेक्टरांनीं भागीदारांची खास सभा बोलाविली आहे.

आमचे प्रमुख जाहिरात प्रतिनिधी
★ दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी ★
९६ नारायण पेठ, पुणें २.

कृष्णा शुगर मिल्स लि.
कृष्णा–कित्तूर
कन्फेक्शनरी सुरू झाली.
धंद्याच्या वाढीसाठी ठेवी स्वीकारल्या जातात.
६% क्यु. प्रेफरन्स शेअर्स विक्रीस आहेत.
विशेष माहितीसाठी लिहा.
पोस्टः–कृष्णा–कित्तूर
जिल्हाः–बेळगांव.
विंचूरकर अँण्ड को.
मॅनेजिंग एजण्टस्.

दि रत्नाकर बँक, लि.
( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )
स्थापना : १९४३
मुख्य कचेरीः भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर
शाखा—सांगली, शाहुपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,१७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | १०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | १५,००,००० |

—यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—
श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन
श्री. गं.-सि. चौगुले, M. L. A., कोल्हापूर, व्हा. चेअरमन
एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B, मॅनेजर

## मुंबई प्रांतांतील सहकारी चळवळीची प्रगति
### ( १-१-१९४८ ते ३०-६-१९४८ )

३० जून, १९४८ अखेरच्या सहामाहींत मुंबई प्रांतांत एकूण ५३१ नव्या सोसायट्या नोंदण्यांत आल्या. त्यापैकीं ३१० खेडेगांवी व २२१ शहरी आहेत. त्यांची वर्गवारी खाली दिली आहे:—

| रूरल | सोसायट्यांची संख्या |
|---|---|
| अॅ. क्रेडिट व थ्रिफ्ट | १८२ |
| मल्टिपर्पज | ७७ |
| कॉप प्रोटेक्शन | ७ |
| बेटर फार्मिंग | २० |
| जॉइंट फार्मिंग | ८ |
| परचेस अँड सेल युनियन | १ |
| कॅटल ब्रीडिंग | २ |
| इरिगेशन | १ |
| हाउसिंग | २२ |
| | एकूण ३१० |

| अर्बन | सोसायट्यांची संख्या |
|---|---|
| अर्बन बँका व सोसायट्या | ९ |
| सॅलरी अर्नर्स | ७ |
| प्रोड्यूसर्स | ७० |
| वीव्हर्स | ८ |
| कंझ्यूमर्स | २८ |
| डेअरी | ४ |
| हाउसिंग | ७५ |
| मोटार ट्रॅन्सपोर्ट | ४ |
| एज्युकेशन-लायब्ररी | १ |
| इलेक्ट्रिक सप्लाय | १ |
| फ्रूट- व्हेजिटेबल | ५ |
| जनरल | ३ |
| सु. युनियन | १ |
| लेबरर्स | १ |
| डि. को. बोर्डस | ३ |
| वर्कशॉप | १ |
| | एकूण २२१ |

रूरल सोसायट्यांत थ्रिफ्ट–क्रेडिट–मल्टिपर्पज सोसायट्यांची संख्या विशेष वाढणें स्वाभाविकच होतें. मुंबई शेतकरी कर्ज निवारण कायदा सबंध प्रांतास लागू करण्यांत आला आणि नोव्हेंबर, १९४७ पासून सावकारी नियंत्रणाचा कायदा अंमलांत आला, त्याचा हा परिणाम आहे. २४९ क्रेडिट व मल्टिपर्पज सोसायट्या सहा महिन्यांत नोंदविल्या गेल्या आहेत.

मल्टिपर्पज सोसायट्यांपैकीं ५ सोसायट्या ठाणें जिल्ह्यांतील कोळी लोकांसाठीं आहेत. त्यांच्या धंद्यास लागणारें साहित्य पुरविणें हा त्यांचा उद्देश आहे. मच्छीमारीचा धंदा सहकारी तत्त्वावर उभारण्यास सहकारी आर्थिक सहाय्यानें प्रोत्साहन दिलें आहे. ठाणें जिल्ह्यांतील ह्या सोसायट्यांसाठीं एक सहकारी परचेस-सेल सोसायटीहि नोंदण्यांत आली आहे. अहमदनगर जिल्ह्यांतील राहुरी तालुक्यामधील पुरामुळें नुकसान पावलेल्या प्रदेशांत २२ हाउसिंग सोसायट्या काढण्यांत आल्या आहेत. ह्या सोसायट्यांना मुक्त हस्तानें मदत व कर्जें देण्याचें सरकारचें धोरण आहे.

३०-६-१९४८ अखेर संपलेल्या सहामाहींत एकूण २२१ अर्बन सोसायट्या नोंदल्या गेल्या. अर्बन बँका व पगारदारांच्या सोसायट्या ह्यांत हळूहळू वाढ होत असली, तरी नियंत्रणें कमी करण्याचें धोरण सरकारनें पत्करलें त्यामुळें कंझ्यूमर्स सोसायट्यांच्या स्थापनेसाठीं मागणी ह्या सहामाहींत कमी झाली. हाउसिंग सोसायट्यांच्या नोंदणींत एकसारखी भर पडत आहे. ह्या सहा महिन्यांत ७५ हाउसिंग सोसायट्या निघाल्या आहेत, त्यापैकीं ३३ मुंबईंत असून अहमदाबाद येथें ११, हुबळी येथें ४ आणि बेळगांव जिल्ह्यांत ३ आहेत. हुबळी तालुक्यांतील २ सोसायट्या मागासलेल्या जातींसाठीं आहेत. उत्पादकांच्या ७० व विणकरांच्या ८ सोसायट्या निघाल्या ह्यावरून औद्योगिक सहकाराची प्रगति दिसून येते. सातारा सैनिक मोटार सहकारी संघ, जयहिंद सहकारी मोटार वहातुक संघ, ह्याप्रमाणेंच वीज पुरवठ्यासाठीं निघालेल्या दोन सोसायट्या, ह्याहि उल्लेखनीय आहेत.

### शेड्यूल्ड बँकांच्या शाखावाढींत खंड

शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांच्या संख्यांचा तुलनात्मक तक्ता खाली दिला आहे, त्यावरून त्यांच्या शाखांत कशी घट झाली आहे, हें दिसून येईल:—

| | ३०-६-४८ | ३१-३-४८ | ३१-१२ ४७ | ३०-९-४७ | ३०-६-४७ |
|---|---|---|---|---|---|
| इंपीरिअल बँक | ४४७ | ४४८ | ४४४ | ४४३ | ४४७ |
| प्रमुख पांच जॉ. स्टॉ. बँका | ७४२ | ७२९ | ७४१ | ७५७ | ७८४ |
| एक्सचेंज बँका | ८३ | ७९ | ७९ | ८० | ८० |
| इतर शेड्यूल्ड बँका | २,१८८ | २,२५५ | २,२७२ | २,२८५ | २,२५३ |
| एकूण | ३,४६० | ३,५११ | ३,५३६ | ३,५६५ | ३,५६४ |

३० जून, १९४८ अखेरच्या तिमाहीपुरतें पाहिलें, तर ह्या मुदतींत शेड्यूल्ड बँकांनीं ६६ नव्या कचेऱ्या उघडल्या व ११७ चालू कचेऱ्या बंद केल्या. म्हणजे, त्यांच्या एकूण कचेऱ्यांत ५१ ची घट झाली. बँक ऑफ कॉमर्स आणि इंडस्ट्रिअल बँक ऑफ वेस्टर्न इंडिया ह्या दोन बँका शेड्यूल्ड बँकांच्या यादींतून वगळण्यांत आल्यामुळें त्यांच्या १२ कचेऱ्याहि तक्त्यांतून गेल्या. भारत बँकेनें २ कचेऱ्या उघडल्या, तर ३२ बंद केल्या. म्हणजे, जून १९४८ अखेर तिच्या २२३ कचेऱ्या राहिल्या. सेंट्रल बँक ऑफ इंडियानें १ नवी कचेरी उघडली व ९ कचेऱ्या बंद केल्या आणि अशा रीतीनें ३५१ कचेऱ्या चालू ठेवल्या. पंजाब नॅशनल बँकेनें २३ कचेऱ्या उघडल्या व २ बंद केल्या. युनायटेड कामर्शिअल बँकेनें एकहि कचेरी बंद न करता ९ नव्या कचेऱ्या उघडल्या.

शेड्यूल्ड बँकांनीं ६६ नव्या कचेऱ्या उघडल्या. त्यांची प्रांतवारी खालीलप्रमाणें आहे:—

| | | | |
|---|---|---|---|
| संयुक्त प्रांत: | १० | पूर्व पंजाब: | ७ |
| पश्चिम बंगाल: | ६ | सिंध: | ५ |
| बिहार: | ४ | दिल्ली: | ४ |
| मुंबई: | ३ | पश्चिम पंजाब: | ३ |
| मद्रास: | २ | सरहद्द प्रांत: | २ |
| पूर्व बंगाल: | १ | ओरिसा: | १ |
| | | हिंदी संस्थानें: | १८ |

### पुणें विद्यापीठावर श्री. काळे ह्यांची निवडणूक

पुणें विद्यापीठाच्या "कोर्ट"वर व्यापारी व औद्योगिक संस्थांच्या प्रतिनिधींसाठी दोन जागा आहेत. त्यावर "अर्था"चे संपादक श्री. श्री. वा. काळे व मुंबईचे प्रो. द. रा. धारपुरे ह्या दोघांची बिनविरोध निवडणूक झाली असल्याचें विद्यापीठानें जाहीर केलें आहे.

### सहकारी सोसायट्यांच्या सेक्रेटरींचा ट्रेनिंग क्लास

मु॥ सांगोले, जि॥ सोलापूर, येथें सहकारी सोसायट्यांच्या सेक्रेटरींचा वर्ग ता. १० नोव्हेंबरपासून सुरू झाला.

सदर वर्गाचा उद्घाटन समारंभ मे. एस्. जी. काळे, मामलेदार, सांगोले, यांचे अध्यक्षतेखाली थाटानें साजरा झाला. सदर प्रसंगीं मे. मामलेदार साहेब, युनियन प्रेसिडेंट, मि. देशपांडे को. ट्रेनिंग इन्स्पेक्टर, मि. देशमुख यांचीं भाषणें झालीं.

मे. मामलेदारसाहेब यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत देशांतील सहकारी चळवळीचें थोडक्यांत मूल्यमापन केलें. त्याच प्रमाणें सोसायटीच्या व्यवहारांत सेक्रेटरीला अतिशय महत्त्वाचें स्थान असल्याचें सांगून सदर क्लास उघडल्याचें जाहीर केलें. शेवटीं आभारप्रदर्शन व राष्ट्रगीत होऊन हा समारंभ संपला.

### श्रीलक्ष्मी सें. को. बँक लि., फलटण

कार्तिक शु॥ १ शके १८७० च्या सुमुहूर्तावर राजवाड्यासमोरील दरबार गेस्टहाऊसच्या प्रशस्त तीन मजली इमारतींत बँकेच्या कचेरीचें स्थलांतर करण्यांत आलें. त्यानिमित्त मंगळवार दिनांक २ नोव्हेंबर १९४८ रोजीं सकाळीं ९ ते ११ वाजेपावेतों बँकेच्या इमारतींत पानसुपारी—समारंभ करण्यांत आला.

### ८½ लक्ष रुपयांच्या २४ डॅमलर गाड्या

ग्रेट ब्रिटनचे राजे ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड ह्या वसाहतींना भेट देणार आहेत. त्यावेळीं त्यांच्या वापरासाठी २४ डॅमलर मोटारगाड्या तयार करण्यांत आल्या आहेत, त्या लंडन येथें नुकत्याच दाखविण्यांत आल्या. दौऱ्यानंतर ह्या मोटारी तेथेंच ठेवण्यांत येतील. ह्या २४ मोटारींची किंमत ८ लक्ष, ६१ हजार रुपये होईल.

### राजाच्या मुखवट्याऐवजी अशोकस्तंभ

हिंदुस्थानाच्या नव्या चलनी नोटांवर हल्लींच्या राजाच्या मुखवट्याऐवजी अशोकस्तंभाचें चित्र छापण्यांत येणार आहे. रुपयावाल्या नोटाच प्रथम १९४९ चे सुरवातीस निघणार आहेत. मोठ्या किंमतीच्या नोटांचें स्वरूप कसें असावें हें ठरविण्याचें काम रिझर्व्ह बँकेच्या डायरेक्टरांच्या कमिटीकडे सोपविण्यांत आलें आहे.

### होळ येथील सहकारी दिन

नीरा-बारामती हद्दीमधील चालू वर्षाचा सहकारी दिन होळ येथें धुमाळ वस्तीवर साजरा करण्यांत आला. त्यावेळीं सहकारी चळवळीसंबंधीं भाषणें झालीं.

### रिझर्व्ह बँकेकडील सक्तीच्या ठेवींत वाढ

शेडयूल्ड बँकांना त्यांच्या एकूण देण्याच्या २०% ते ३०% इतकी रक्कम रिझर्व्ह बँकेंत सक्तीनें ठेवण्यास लावण्याचा रिझर्व्ह बँकेस अधिकार असावा, असें तिचें म्हणणें आहे. सध्याच्या कायद्याप्रमाणें २०% इतकी रक्कम त्यांनीं ठेवली तरी चालते. ही मर्यादा ३०% पर्यंत वाढविण्याचा हेतु, बँकांजवळील जादा शिलकी पैसा शोषून घेणें हा आहे. मर्यादेचें प्रमाण एकदाच ठरवून न टाकतां तें लवचीक असावें, असा रिझर्व्ह बँकेचा आग्रह आहे. उदाहरणार्थ, चलनविस्तार फाजील झाला, तर ३०% पर्यंत रक्कम रिझर्व्ह बँक मागूं शकेल परंतु ती २०% च्या खालीं मात्र कधीं जाणार नाहीं.


## दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

( स्थापना सन १९२७ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,७६,१०० रु. |
| भरलेलें भांडवल | १,०३,९५० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,१७,००० रु. |
| खेळतें भांडवल | ११,००,००० रु. |


या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागीदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. सोन्याचे तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक-हुंड्यांची खरेदी-विक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदी-विक्री व व्याज-वसुली वगैरे

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार**

**या बँकेमार्फत केले जातात.**

ना. पां. ठाणेदार
मॅनेजर





## अधिक धान्य पिकविण्याची योजना

—यशस्वी होण्यास—

# किर्लोस्कर पंपिंग सेट्स

## हें अमोघ साधन आहे.

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

### ए. आय. आय. बी

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्सच्या वरील परीक्षेंत उत्तीर्ण होऊन इन्स्टिट्यूटच्या असोसिएट सर्टिफिकेटास पात्र झालेल्या २७२ उमेदवारांत खालील नांवें आढळतातः—

भा. श्री. कल्याणपूरकर ( मुं. प्रां. स. बँक, नाशिक ), गो. ना. बर्वे ( बँक ऑफ कोल्हापूर, कोल्हापूर ), श. मा. हजारनवीस ( यु. कमर्शिअल बँक, नागपूर ), श्री. श्री. मुतालिक ( मुं. प्रां. स. बँक, कोपरगांव ), ग. कु. चाफेकर (इंपीरिअल बँक, खांडवा), र. मा. फाटक ( इंपीरिअल बँक, ग्वालेर ), रा. पां. जोशी ( बांठिया बँक, पनवेल ) वि. वि. शेंडे ( यु. कमर्शिअल बँक, कलकत्ता ), वि. म. गाडगीळ ( हैद्राबाद स्टेट बँक, नांदेड ), वा. ना. नवाथे ( रिझर्व्ह बँक, मुंबई ) द. दि. दिक्षित ( इंपीरिअल बँक, पुणें ), वि. कु. चिपलकट्टी ( बँक ऑफ इंडिया, पुणें कँ. ), श्री. वा. काळे ( बँक ऑफ महाराष्ट्र, पुणें )

### ब्रिटिश कारखानदारांच्या निर्गत मालाच्या किंमती

कच्चा माल आयात करून त्याच्या बदली पक्का माल निर्गत करणाऱ्या देशांना युद्ध-समाप्तीनंतर कच्चा माल मिळण्याची अडचण भासत आहे. परंतु ती आतां दूर झाली आहे. जळणाचें उत्पादन ३३% वाढलें आहे, रबराचें उत्पादन दुप्पट झालें आहे, पोलादाच्या उत्पादनांत १०% वाढ झाली आहे आणि तांबें, जस्त, शिसें, टिन ह्या सर्वांच्या उत्पादनांत वाढ दिसत आहे. कच्चा माल उपलब्ध असला तरी त्याची किंमत मात्र भारी आहे. ग्रेट ब्रिटन जेवढा कच्चा माल आयात करतो तितका दुसरा कोणीहि करीत नाहीं आणि पक्क्या मालाच्या निर्गतींत त्याचा दुसरा अनुक्रम लागतो. ग्रेट ब्रिटनच्या पक्क्या मालास जेवढी किंमत येते त्या मानानें कच्च्या मालास तो अधिक किंमत देत आहे. अर्थात्, पक्का माल अधिक महाग दरानें विकणें ब्रिटिश कारखानदारांना सहज शक्य आहे. परंतु आपलें गिऱ्हाइक सांभाळण्यासाठी हे कारखानदार दूर-दृष्टीनें आपल्या मालाची विक्रीची किंमत मर्यादेंत ठेवीत आहेत.

### प्रेसिडेंट हॅरी एस. ट्रूमन

१२ एप्रिल, १९४५ रोजीं अमेरिकेचे अध्यक्ष, मि. रूझवेल्ट हे मृत्यू पावले आणि उपाध्यक्ष मि. ट्रूमन हे अध्यक्ष बनले. नुकतीच अध्यक्षाची जी नवी निवडणूक झाली, त्यांत ते निवडून आले. म्हणजे, आणखी चार वर्षे ते अध्यक्ष म्हणून रहातील. प्रे. ट्रूमन हे अमेरिकेचे ३२ वे अध्यक्ष आहेत. अमेरिकेच्या माजी अध्यक्षांपैकीं मि. हर्बर्ट हूवर हे एकटेच हयात आहेत. ते १९२८ ते १९३२ अध्यक्ष होते. मि. ट्रूमन ह्यांची निवडणूक होणार नाहीं, अशीच बहुतेकांची कल्पना होती. त्यांची उंची ५ फूट १० इंच असून त्यांचें वजन १७० पौंड आहे. पहिल्या महायुद्धांत त्यांनीं प्रत्यक्ष आघाडीवर लष्करी नोकरी केली, त्यावेळचा गणवेष अजूनहि त्यांना लहान होत नाहीं, ह्यावरून त्यांच्या प्रकृतीची कल्पना येईल. त्यांचा जन्म १८८४ सालांतला आहे. प्रेसिडेंट व मिसेस ट्रूमन ह्यांना मेरी मार्गारेट नांवाची एकच मुलगी आहे, तिचें वय २३ वर्षांचें असून ती अद्याप अविवाहित आहे. प्रे. ट्रूमन हे धूम्रपान करीत नाहींत.

नवीन पुष्कळ निघाले, तरी
तुळजाराम मोदी,
सातारा
ह्यांचें पुढारीपण कायम आहे.




'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार







हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजनिगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.